06 FEB 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समस्येच्या मुळापर्यंत जाण्यास संशोधन उपयुक्त

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के : माध्यम संशोधन कार्यशाळेचे उद्घाटन




कोल्हापूर : मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत डॉ. शिवाजी जाधव, डॉ. विनोद निताळे, डॉ. बापू चंदनशिवे आदी.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संशोधनातून वास्तवाचे दर्शन होते. कोणत्याही समस्येच्या मुळांपर्यंत जाण्यासाठी संशोधन उपयुक्त ठरत असते, असे मत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने आयोजित माध्यम संशोधन कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कोणत्याही विषयाची सखोल माहिती मिळवण्यासाठी संशोधन आवश्यक असते. मिळालेल्या माहितीवर प्रक्रिया करावी लागते. माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण आणि त्यानंतर तथ्यांची मांडणी करावी लागते. हे सर्व करण्यासाठी विविध सॉफ्टवेअरचा वापर करावा लागतो. संशोधकांनी अनेक स्रोतांद्वारे डेटा संकलित करून त्याचे विश्लेषण आणि सादरीकरण करेपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया संशोधनाचा एक भाग आहे. समस्यांची सोडवणूक करायची असेल, तर चांगल्या प्रतीचे संशोधन होणे आवश्यक आहे.

केंद्र आणि राज्य सरकारे विविध प्रकारची माहिती संकलित करत असतात. ही माहिती सर्वांना उपलब्ध होण्यासाठी पोर्टलवर ठेवण्यात आली आहे. संशोधकांनी हा डेटा अभ्यासला, तर त्यातून अनेक तथ्ये समोर येतील. असलेल्या व्यवस्थेत आणखी सकारात्मक सुधारणा करण्याची संधी यातून मिळेल, असेही डॉ. शिर्के म्हणाले.

स्वागत व प्रास्ताविक मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. जयप्रकाश पाटील यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. उद्देश पाटील याने सूत्रसंचालन केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले. यावेळी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशनच्या अमरावती कॅम्पसमधील मीडिया विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. विनोद निताळे, अहिल्यानगर येथील कम्युनिकेशन स्टडीजचे माजी विभागप्रमुख डॉ. बापू चंदनशिवे, समन्वयक डॉ. शिवाजी जाधव व्यासपीठावर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
06 FEB 2025 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# नोकऱ्यांसाठी विद्यार्थ्यांनी विदेशी भाषेचा उपयोग करावा

■ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

विदेशी भाषा, कला आणि संस्कृतीचा परिचय करून देणारा हा उत्सव म्हणजे विविध जागतिक संस्कृतींना जोडणारा दुवा आहे. शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणाच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा उपक्रम असून विद्यार्थ्यांनी आपल्या कारकीर्दीसाठी या विदेशी भाषा शिक्षणाचा उत्तम उपयोग करून घ्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विद्यार्थ्यांना केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'कार्निव्हल-२०२५' या कला-सांस्कृतिक महोत्सवात ते बोलत होते. महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये झाले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित 'कार्निव्हल' महोत्सवातील प्रदर्शनाची विद्यार्थ्यांकडून माहिती घेताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. मेघा पानसरे, डॉ. नंदकुमार मोरे.

कार्निव्हलमध्ये रशियन, जर्मन, जपानी आणि पोर्तुगीज भाषेच्या विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या त्या-त्या देशांमधील पारंपरिक कला वस्तूंचे प्रदर्शन मांडण्यात आले. रशियन विद्यार्थ्यांनी समवार, मत्र्योश्का बाहुली, स्त्रियांचे पारंपरिक रंगीबेरंगी स्कार्फ, इकोना चित्रे, त्सार टोपी, पारंपरिक लाकडी व काचेच्या वस्तू आणि रशियन रंगचित्रे यांची मांडणी केली. जपानी विषयाच्या विद्यार्थ्यांनी आकर्षक जपानी चित्रे, 'ओरीगामी'चे विविध प्रकार, 'साकुरा' फुले आणि माउंट फुजीच्या कलाकृती, जपानी घरे आणि मंदिरे यांच्या प्रतिकृती, जपानी राहणीमानाची माहिती देणारे फलक तसेच शिबोरी प्रकारातील पर्यावरणस्नेही वस्तूंचे सुंदर प्रदर्शन मांडले होते. कोल्हापुरातील डी.वाय. पाटील स्कूल ऑफ हॉस्पिटॅलिटी यांच्या सहकार्याने कार्निव्हलमध्ये विदेशी उपहाराचे स्टॉल लावण्यात आले होते. यावेळी विदेशी भाषा अधिविभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अनिल घुले स्नेहल शेट्ये, प्रियांका माळकर, ज्योती पाटील, गीतांजली शहा, स्नेहा वझे, ऐश्वर्या चव्हाण आदी उपस्थित होते.

06 FEB 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समस्येच्या मुळापर्यंत जाण्यास संशोधन उपयुक्त

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

संशोधनातून वास्तवाचे दर्शन होते. कोणत्याही समस्येच्या मूळापर्यंत जाण्यासाठी संशोधन उपयुक्त ठरत असते, असे मत कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने आयोजित माध्यम संशोधन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.




कोल्हापूर : माध्यम संशोधन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. शिवाजी जाधव, डॉ. विनोद निताळे, डॉ. बापू चंदनशिवे.

कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, कोणत्याही विषयाची सखोल माहिती मिळविण्यासाठी संशोधन आवश्यक असते. मिळालेल्या माहितीवर प्रक्रिया करावी लागते. माहितीचे वर्गीकरण,विश्लेषण आणि त्यानंतर तथ्यांची मांडणी करावी लागते. हे सर्व करण्यासाठी विविध सॉफ्टवेअरचा वापर करावा लागतो. संशोधकांनी अनेक स्त्रोतांद्वारे डेटा संकलित करुन त्याचे विश्लेषण आणि सादरीकरण करेपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया संशोधनाचा एक भाग आहे. समस्यांची सोडवणूक करायची असेल तर चांगल्या प्रतीचे संशोधन होणे आवश्यक आहे. केंद्र आणि राज्य सरकारे विविध प्रकारची माहिती संकलित करत असतात. ही माहिती सर्वांना उपलब्ध होण्यासाठी पोर्टलवर ठेवण्यात आली आहे. संशोधकांनी हा डेटा अभ्यासला तर त्यातून अनेक तथ्ये समोर येतील. असलेल्या व्यवस्थेत आणखी सकारात्मक सुधारणा करण्याची संधी यातून मिळेल.

स्वागत डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. जयप्रकाश पाटील यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिली. उद्देश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.अमरावतीमधील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशनचे डॉ. विनोद निताळे, अहिल्यानगर येथील कम्युनिकेशन स्टडीजचे माजी विभागप्रमुख डॉ. बापू चंदनशिवे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 FEB 2025
Times of India

# Shivaji University hosts Carnival '25

TOI



A fest to promote internationalisation of education

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: The foreign language department of Shivaji University, Kolhapur (SUK) unveiled its art and culture festival 'Carnival-2025' on Wednesday.

Students from various language departments took part in the events.

The event was inaugurated by vice-chancellor Dr D T Shirke who said, "This is an important activity in terms of the internationalisation of education. Students should make good use of this foreign language education for their careers."

Russian language students arranged samovars, matryoshka dolls, women's traditional colourful scarves and tsar hats. Japanese language students put up a display of attractive Japanese paintings.

German language students displayed car models, football stadiums, information about the cities of Hamburg and Berlin while Portuguese students exhibited ceramic plates, porcelain items, traditional aprons and tribal hats made from forest seeds.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 FEB 2025
सकाळ

# समस्येच्या मुळापर्यंत जाण्यास संशोधन उपयुक्त : डॉ. शिर्के

कोल्हापूर : 'संशोधनातून वास्तवाचे दर्शन होते. कोणत्याही समस्येच्या मुळांपर्यंत जाण्यासाठी संशोधन उपयुक्त ठरत असते', असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज व्यक्त केले. विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित माध्यम संशोधन कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. यावेळी डॉ. विनोद निताळे, डॉ. बापू चंदनशिवे, डॉ. शिवाजी जाधव उपस्थित होते.

06 FEB 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात 'कार्निव्हल'ला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद





कोल्हापूर : 'कार्निव्हल-२०२५' महोत्सवाचे उद्घाटन करताना मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात प्रदर्शनात मांडलेल्या आकर्षक विदेशी वस्तू.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित 'कार्निव्हल-२०२५' या कला-सांस्कृतिक महोत्सवाला बुधवारी विद्यार्थी-विद्यार्थिनींचा मोठा प्रतिसाद लाभला. रशिया, जपान, पोर्तुगाल आणि जर्मनी या देशांच्या कला-संस्कृतीचा परिचय करून घेण्याची संधी या निमित्ताने विद्यापीठातील विद्यार्थ्यांना लाभली.

महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये झाले. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले की, विदेशी भाषा, कला आणि संस्कृतीचा परिचय करून देणारा हा उत्सव म्हणजे विविध जागतिक संस्कृतींना जोडणारा दुवा आहे. शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा उपक्रम असून, विद्यार्थ्यांनी आपल्या कारकीर्दीसाठी या विदेशी भाषा शिक्षणाचा उत्तम उपयोग करून घ्यावा.

कार्निव्हलमध्ये रशियन, जर्मन, जपानी आणि पोर्तुगीज भाषांच्या विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या त्या-त्या देशांतील पारंपरिक कला वस्तूंचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. रशियन विद्यार्थ्यांनी समवार, मत्र्योश्का बाहुली, स्त्रियांचे पारंपरिक रंगीबेरंगी स्कार्फ, इकोना चित्रे, त्सार टोपी, पारंपरिक लाकडी व काचेच्या वस्तू आणि रशियन रंगचित्रे यांची मांडणी केली. जपानी विषयाच्या विद्यार्थ्यांनी आकर्षक जपानी चित्रे, 'ओरिगामी'चे विविध प्रकार, 'साकुरा' फुले व माऊंट फुजीच्या कलाकृती, जपानी घरे व मंदिरे यांच्या प्रतिकृती, जपानी राहणीमानाची माहिती देणारे फलक तसेच शिबोरी प्रकारातील पर्यावरणस्नेही वस्तूंचे सुंदर प्रदर्शन मांडले. जर्मन भाषेच्या विद्यार्थ्यांनी विविध कंपन्यांच्या मोटारींचे मॉडेल्स, फुटबॉल स्टेडियम, हॅम्बुर्ग व बर्लिन शहरे यांची माहिती प्रदर्शित केली. पोर्तुगीज विद्यार्थ्यांनी पोर्तुगालमधील सिरॅमिक प्लेटस्, पोर्सिलीन वस्तू, की चेन, फ्रीज मॅग्नेट, स्कार्फ, पारंपरिक ॲप्रन, आदिवासींनी जंगलातील बियांपासून बनवलेली टोपी, शिकारीची शस्त्रे, पिंग, गालिन्या, काफे, परफ्युम यांसह अन्य वस्तूंचे प्रदर्शन मांडले. डी. वाय. पाटील स्कूल ऑफ हॉस्पिटॅलिटी यांच्या सहकार्याने कार्निव्हलमध्ये विदेशी उपाहाराचे स्टॉल लावण्यात आले होते. सुरुवातीला रशियन भाषेच्या विद्यार्थिनींनी रशियनमधून स्वागतगीत सादर केले. यावेळी विदेशी भाषा अधिविभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अनिल घुले यांच्यासह कार्निव्हलच्या आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या स्नेहल शेट्ये, प्रियांका माळकर, ज्योती पाटील, गीतांजली शहा, स्नेहा वझे, ऐश्वर्या चव्हाण आदी उपस्थित होते.

**महोत्सवात आज सांस्कृतिक कार्यक्रम**

विदेशी भाषा कार्निव्हलअंतर्गत गुरुवारी दुपारी ४ वाजता वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात विविध देशांच्या कलांचे दर्शन घडवणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 FEB 2025

लोकमत



शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित 'कार्निव्हल-२०२५' महोत्सवाअंतर्गत प्रदर्शनामध्ये आकर्षक विदेशी वस्तूंची मांडणी केली आहे.

# 'कार्निव्हल-२५'मध्ये विविध देशांच्या कला-संस्कृतीचा परिचय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित 'कार्निव्हल-२०२५' या कला-सांस्कृतिक महोत्सवाला विद्यार्थी-विद्यार्थिनींचा मोठा प्रतिसाद लाभला. रशिया, जपान, पोर्तुगाल आणि जर्मनी या देशांच्या कला-संस्कृतीचा परिचय करून घेण्याची संधी या निमित्ताने विद्यार्थ्यांना लाभली.

कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन झाले. ते म्हणाले की, विदेशी भाषा, कला आणि संस्कृतीचा परिचय करून देणारा हा उत्सव म्हणजे जागतिक संस्कृतींना जोडणारा दुवा आहे.

कार्निव्हलमध्ये रशियन, जर्मन, जपानी व पोर्तुगीज भाषेच्या विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या त्या-त्या देशांतील पारंपरिक कला वस्तूंचे प्रदर्शन मांडले होते. रशियन विद्यार्थ्यांनी समवार, मत्र्योश्का बाहुली, स्त्रियांचे पारंपरिक रंगीबेरंगी स्कार्फ, इकोना चित्रे, त्सार टोपी, पारंपरिक लाकडी व काचेच्या वस्तू व रशियन रंगचित्रे यांची मांडणी केली. डी.वाय. पाटील स्कूल ऑफ हॉस्पिटॅलिटीच्या सहकार्याने विदेशी उपाहाराचे स्टॉल लावले होते. वेगवेगळ्या देशांतील लोकप्रिय खाद्यपदार्थांचा आस्वादही उपस्थितांना घेता आला.

रशियन भाषेच्या विद्यार्थिनींनी रशियनमधून स्वागतगीत सादर केले. विदेशी भाषा अधिविभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अनिल घुले, स्नेहल शेट्ये, प्रियांका माळकर, ज्योती पाटील, गीतांजली शहा, स्नेहा वझे आणि ऐश्वर्या चव्हाण उपस्थित होते.

## आज सांस्कृतिक कार्यक्रम

विदेशी भाषा कार्निव्हलअंतर्गत आज, गुरुवारी सायंकाळी ४ वाजता वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात विविध देशांच्या कलांचे दर्शन घडविणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

0 6 FEB 2025

सकाळ


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात रंगला 'कार्निव्हल'

## रशियन, जर्मन, जपानमधील कला-वस्तूंचे प्रदर्शन

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित 'कार्निव्हल-२०२५' या कला-सांस्कृतिक महोत्सवाला आज विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रशिया, जपान, पोर्तुगाल, जर्मनी या देशांच्या कला-संस्कृतीचा परिचय करून घेण्याची संधी या निमित्ताने विद्यार्थ्यांना लाभली.

या कार्निव्हलचे उद्‍घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये झाले. कार्निव्हलमध्ये रशियन, जर्मन, जपानी, पोर्तुगीज भाषांच्या विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या त्या-त्या देशांतील पारंपरिक कला-वस्तूंचे प्रदर्शन मांडले आहे. रशियन विद्यार्थ्यांनी समवार, मत्र्योश्का बाहुली, स्त्रियांचे पारंपरिक रंगीबेरंगी स्कार्फ, इकोना चित्रे, त्सार टोपी, पारंपरिक लाकडी, काचेच्या वस्तू, तर जपानी विषयाच्या विद्यार्थ्यांनी आकर्षक जपानी चित्रे, 'ओरिगामी'चे विविध



प्रकार, 'साकुरा' फुले आणि माऊंट फुजीच्या कलाकृती मांडल्या आहेत. जर्मन भाषेच्या विद्यार्थ्यांनी फुटबॉल स्टेडियम, हॅम्बुर्ग, बर्लिन शहरे यांची माहिती प्रदर्शित केली आहे. पोर्तुगीज विद्यार्थ्यांनी पोर्तुगालमधील सिरॅमिक प्लेटस्, पोर्सिलीन वस्तू, आदिवासींनी जंगलातील बियांपासून बनवलेली टोपी, आदी वस्तूंचे प्रदर्शन मांडले.

डी. वाय. पाटील स्कूल ऑफ हॉस्पिटॅलिटी यांच्या सहकार्याने लावलेल्या स्टॉलवर वेगवेगळ्या देशांतील लोकप्रिय खाद्यपदार्थांचा आस्वादही उपस्थितांना घेता आला.

> 'विदेशी भाषा, कला आणि संस्कृतीचा परिचय करून देणारा हा उत्सव म्हणजे विविध जागतिक संस्कृतींना जोडणारा दुवा आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या कारकिर्दीसाठी या विदेशी भाषा शिक्षणाचा उत्तम उपयोग करून घ्यावा.
> **- डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

यावेळी विदेशी भाषा अधिविभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, रणधीर शिंदे, अनिल घुले, स्नेहल शेट्ये, प्रियांका माळकर, ज्योती पाटील, गीतांजली शहा, स्नेहा वझे, ऐश्वर्या चव्हाण उपस्थित होते. गुरुवारी(ता.६) दुपारी चार वाजता वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 FEB 2025
लोकमत

# विद्यापीठात श्याम बेनेगल यांच्या चित्रपटावर उद्यापासून सेमिनार

**कोल्हापूर :** विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्राच्या वतीने उद्या, शुक्रवारपासून 'दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या चित्रपटातील महिला प्रतिमा' विषयावर मानव्यशास्त्र सभागृहात दोन दिवसीय सेमिनारचे आयोजन केले आहे. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

प्र-कुलगुरू प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित असणार आहे. बीजभाषण डॉ. चंद्रकांत लंगरे करणार आहेत. डॉ. विश्राम ढोले अध्यक्षस्थानी असतील. बेनेगल यांच्या चित्रपठ चळवळीत महत्त्वाचे योगदान आहे. त्यांच्या योगदानावर डॉ. राजेंद्र गोणारकर, डॉ. प्रसाद ठाकूर, डॉ. विशाखा गारखेडकर, सरफराज मुल्ला, डॉ. अंजली निगवेकर मार्गदर्शन करणार आहेत. नाममात्र शुल्क भरून नोंदणी आवश्यक आहे. सहभागींना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या सेमीनारचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राच्या संचालक डॉ. नीशा मुडे-पवार यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 FEB 2025

पुढारी

# विद्यापीठात श्याम बेनेगल यांच्या चित्रपटावर राज्यस्तरीय सेमिनार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्राच्या वतीने दि. ७ व ८ फेब्रुवारी रोजी 'दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या चित्रपटातील महिला प्रतिमा' या विषयावर दोन दिवसीय राज्यस्तरीय सेमिनारचे आयोजन सकाळी अकरा वाजता करण्यात आले आहे. सेमिनारचे उद्घाटन व मार्गदर्शन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) दिगंबर शिर्के करणार आहेत. याप्रसंगी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रमोद पाटील याची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सेमिनारचे बीजभाषण ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक व लेखक डॉ. चंद्रकांत लंगरे करणार आहेत. अध्यक्षस्थानी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे डॉ. विश्राम ढोले आहेत. या कार्यशाळेत डॉ. राजेंद्र गोणारकर (नांदेड), डॉ. प्रसाद ठाकूर (पुणे), डॉ. विशाखा गारखेडकर (औरंगाबाद), सरफराज मुल्ला, डॉ. अंजली निगवेकर (कोल्हापूर) मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी-विद्यापीठ, कोल्हापूर
06 FEB 2025
सकाळ

# राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी डॉ. माने समूह समन्वयक



डॉ. प्रल्हाद माने

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातील डॉ. प्रल्हाद माने यांची भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयामार्फत १७ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी समूह समन्वयक आणि राष्ट्रीय परीक्षक म्हणून निवड झाली आहे. संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव शरद द्विवेदी यांनी त्यांना निवडीचे पत्र पाठविले आहे. डॉ. माने यांच्याकडे चार राज्यांतील एकूण सात विद्यापीठे आणि महाविद्यालयांच्या मूल्यमापनाची जबाबदारी सोपविली आहे. यामध्ये इंदिरा गांधी राष्ट्रीय आदिवासी केंद्रीय विद्यापीठ, चाणक्य राष्ट्रीय विधी विद्यापीठ, बी. जे. वाणिज्य महाविद्यालय, गोपीचंदजी महिला कला महाविद्यालय, गोपीचंदजी महिला वाणिज्य महाविद्यालय, मुंबई विद्यापीठ, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयातील स्पर्धेचे ते मूल्यमापन करतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 FEB 2025

पुढारी

# सामाजिक शास्त्रातील संशोधन जागतिक स्तरावर नेण्यासाठी प्रयत्न व्हावेत

## डॉ. महादेव देशमुख; शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सामाजिक शास्त्रांतील संशोधकांनी आपले संशोधन जागतिक स्तरावर नेण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील सामाजिक शास्त्रांतर्गत 'संशोधन पद्धतीशास्त्राचे सामाजिक शास्त्रांतील महत्त्व'या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा उद्घाटनप्रसंगी डॉ. देशमुख बोलत होते.

डॉ. देशमुख यांनी गुणात्मक व संख्यात्मक संशोधनासाठीच्या पद्धतींविषयी सविस्तर विश्लेषण केले. पहिल्या सत्रात डॉ. कविता वड्राळे यांनी संशोधनामधील नीतीमत्ता, वाङ्मयचौर्य व संदर्भपद्धती यावर तर दुसऱ्या सत्रात डॉ. संतोष सुतार यांनी सामाजिक शास्त्रांसाठी सांख्यिकीय तंत्राविषयी मार्गदर्शन केले.

तिसऱ्या सत्रात डॉ. टी. व्ही. शर्मा यांनी सामाजिक संशोधनातील टप्पे विशद केले. समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रतिमा पवार यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी डॉ. प्रकाश पवार, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. सुखदेव उंदरे आदी उपस्थित होते. डॉ. नेहा वाडेकर, डॉ. मयुरेश पाटील, आकाश ब्राम्हणे, डॉ. दादा ननवरे, डॉ. दिग्विजय पाटील आदींनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 FEB 2025

लोकमत

# ऑनलाइन शिक्षण अपरिहार्य : लोखंडे

**कोल्हापूर :** शिक्षक, विद्यार्थ्यांना ऑनलाइन अध्यापन, अध्ययन करणे अपरिहार्य असणार आहे. यासाठी ई-कंटेंट निर्मितीवर भर द्यायला हवा, असे प्रतिपादन मुंबई येथील महास्वयंम ऑनलाइन कोर्सचे प्रशिक्षक गणेश लोखंडे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन केंद्र, एम. ए. मास कम्युनिकेशन विभागातर्फे 'डिझाइन ॲण्ड डेव्हलपमेंट ऑफ ई- कन्टेन्ट फॉर ऑनलाइन लर्निंग अँड मूक्स' कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते.

एम. ए. मास कम्युनिकेशन अधिविभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, उप-कुलसचिव व्ही. बी. शिंदे, डॉ. सुमेधा साळुंखे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 FEB 2025
लोकमत

# 'होय होय वारकरी'त वारकरी परंपरांचा चिकित्सक वेध

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** वारकरी संप्रदायाच्या परंपरांचा चिकित्सक वृत्तीने वेध घेणारे 'होय होय वारकरी' हे मराठीतील एक महत्त्वाचे पुस्तक आहे, असे मत प्रसिद्ध साहित्यिक प्रा. प्रवीण बांदेकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचे संत तुकाराम अध्यासन आणि मराठी अधिविभाग यांच्यावतीने ह. भ. प. ज्ञानेश्वर बंडगर लिखित 'होय होय वारकरी' या ग्रंथावर आयोजित चर्चेत ते बोलत होते. चर्चेत संत साहित्याचे अभ्यासक डॉ. श्रीरंग गायकवाड, प्राचार्य गोविंद काजरेकर यांनीही सहभाग घेतला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

यावेळी दीपा गायकवाड संपादित 'ज्ञानबा तुकाराम' या विशेष वार्षिकांकाचे प्रकाशन करण्यात आले. लेखक ज्ञानेश्वर बंडगर यांनी ग्रंथाच्या निर्मितीमागील प्रेरणांची माहिती दिली. यावेळी डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, प्रांजली क्षीरसागर, डॉ. सुखदेव एकल उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 FEB 2025
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागाचे माजी विद्यार्थी पलूस येथे उद्योजक बी. आर. पाटील यांनी आयोजित केलेल्या मेळाव्यानिमित्त पन्नास वर्षांनी एकत्र आले.

# विद्यापीठातील रसायनशास्त्राचे विद्यार्थी पन्नास वर्षांनी आले एकत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातून १९७५ मध्ये पदव्युत्तर (एम. एस्सी. अभ्यासक्रम) शिक्षण घेतलेले माजी विद्यार्थी पलूस (जि. सांगली) येथे उद्योजक बी. आर. पाटील यांनी आयोजित केलेल्या मेळाव्यानिमित्त पन्नास वर्षांनी एकत्र आले. पन्नास वर्षांनी एकमेकांना भेटण्यासाठी आतूर झालेले देशाच्या विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या ६० पैकी ३५ जणांनी या दोनदिवसीय मेळाव्याला हजेरी लावली. उद्योजक, व्यावसायिक, प्राचार्य, शिक्षण संस्थांचे प्रमुख, प्राध्यापक, वरिष्ठ शास्त्रज्ञ, सुपरिटेंडन्ट, व्यावसायिक संस्थांचे जनरल मॅनेजर, आदी पदांवरून निवृत्त होणारे हे विद्यार्थी आपले वय आणि हुद्दा विसरून पन्नास वर्षांपूर्वीचे विशीतील विद्यार्थी बनून आनंद घेत होते. कोल्हापुरातील हारुण शेख, अरुण शिरवडेकर या मेळाव्यात सहभागी झाले होते.

06 FEB 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षणातूनच निकोप समाज निर्मितीचे बळ

## आंबेडकरी जलशातून संदेश; आज, उद्या विविध कार्यक्रम

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : 'शिक्षणाने शहाणपण येते, मानवी जगणे सुखकर होते. जातीभेदाच्या भिंती गळून पडताना, मानवतेच्या भावनेतून दुर्बल घटकांनाही जगण्याचा आधार लाभतो. सर्वांचं जगणं सुंदर करण्याची ताकद शिक्षणातून लाभते. शिक्षणातूनच निकोप समाज निर्मितीचे बळ लाभते, असाच संदेश कलावंतानी बुलंद गायकीतून देत फुले - शाहू - आंबेडकरी जलशाचा पहिला दिवस गाजवला.

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे गोविंदराव टेंबे सभागृहात फुले - शाहू - आंबेडकर जलशाला सुरुवात झाली. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे माजी प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, शाहीर राजू राऊत यांच्या उपस्थितीत उद्‍घाटन झाले. यानंतर शाहीर डॉ. आझाद नायकवडी यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा वेध घेणारा 'जय राजर्षी शाहू राजा मुजरा हा माझा...' पोवाडा सादर केला. पोवाड्यात राजर्षी शाहू महाराजांनी केलेल्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा, विविध जाती-धर्मासाठी वसतिगृह, गंगाराम कांबळे यांना हॉटेल काढून देऊन दिलेला समतेचा संदेश, धरणे बांधून शेतीला दिलेले बळ, आदी कार्यांचे वर्णन पोवाड्यातून डॉ. आझाद यांनी केले. त्यांच्या दमदार सादरीकरणाला रसिकांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

लोकसंगीताचे अभ्यासक डॉ. गणेश चंदनशिवे यांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची 'माझी मैना गावाकडे राहिली... माझ्या जीवाची होतीया कायली...' ही नजाकतदार हरकती आणि ढोलकीच्या तालावर छक्कड सादर केली. यानंतरच्या सत्रात नागसेन सावदेकर यांनी प्रबोधनपर गीते गायिली.

फुले - शाहू - आंबेडकरी जलसा राज्य शासनाच्या सांस्कृतिक विभागाने घेतला आहे. त्यासाठीच्या निमंत्रणपत्रिकेत चार मंत्री, तीन खासदार, ११ आमदार यांची नावे आहेत. मात्र, उद्‍घाटन कार्यक्रमासाठी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. गुरुवारी (ता. ६) व शुक्रवारी (ता. ७) जलशात विविध कार्यक्रम होणार आहेत.



कोल्हापूर : राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे बुधवारी फुले-शाहू-आंबेडकरी जलशाच्या उद्‍घाटनप्रसंगी बोलताना शाहीर राजू राऊत. शेजारी डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. गणेश चंदनशिवे, डॉ. छाया पवार व इतर.